लोकसत्ता, शुक्रवार, १७ जून, २०११, पृष्ठ क्रं. २



# चंद्रग्रहणाच्या आविष्कारामुळे खगोलप्रेमी मंत्रमुग्ध

**नवी दिल्ली, १६ जून / पीटीआय**

देशभरातील असंख्य खगोलप्रेमींनी या शतकातील सर्वाधिक कालावधीच्या चंद्रग्रहणाचा काल रात्री अनुभव घेतला. सूर्य आणि चंद्राच्या मधोमध पृथ्वी आल्याने रात्री १० वाजून ५४ मिनीटे आणि ३४ सेकंदांनी पृथ्वीच्या छायेत चंद्र झाकोळला गेला. त्यानंतर प्रत्येक मिनीटाला आकाशाच्या छटा बदलत गेल्या. लाल, केशरी रंगांच्या छटांनी सजलेले आकाश प्रथमच पाहाणारे खगोलप्रेमी या नैसर्गिक अविष्कारामुळे थक्क झाले. पहाटे साडेचार वाजेपर्यंत या ग्रहणाचा प्रभाव टिकला. सूर्यग्रहण अथवा चंद्रग्रहण हा केवळ खगोलप्रेमींचाच नव्हे तर सर्वसामान्य नागरिकांचाही उत्सुकतेचा विषय आहे हे काल रात्री दिसून आले. रात्री अकराच्या सुमारास देशभरात रस्त्यांवर, छतांवर तसेच तारांगणात हे जिज्ञासू जमा झाले होते. येथील नेहरू तारांगणात सर्व वयोगटातील नागरिक जमा झाले होते. या शतकातील हे सर्वाधिक कालावधीचे चंद्रग्रहण असल्याने त्याबाबतची उत्सुकता ताणली गेली होती.

दिल्लीत निरभ्र आकाश असल्याने खगोलप्रेमींना या ग्रहणाचा पुरेपूर आनंद लुटता आला. चंद्रग्रहणाच्या पहिल्यावहिल्या अनुभवामुळे यातील अनेकजण भारावून गेले होते.

हा अनुभव खरोखर थक्क करणारा होता, मी या ग्रहणाची छायाचित्रेही काढली असून ती अतिशय विलोभनीय आली आहेत, अशी प्रतिक्रिया प्रतीक या हौशी अंतराळवीराने व्यक्त केली. याप्रकारचे खग्रास चंद्रग्रहण मी कधीही पाहिले नव्हते, या अनुभवामुळे मी मंत्रमुग्ध झाले, असे निशा गुप्ता या शिक्षिकेने सांगितले. ■

## यानंतर एकदम २१४१ साली!

रात्री १० वाजून ५४ मिनीटे आणि ३४ सेकंदांनी हे ग्रहण लागले, मात्र मध्यरात्री १२ वाजून ५२ मिनीटांनी आणि ३० सेकंदांनी चंद्र पूर्णपणे झाकोळला गेला आणि मध्यरात्री दोन वाजून ३२ मिनीटे आणि ४२ सेकंदांपर्यंत हा प्रभाव टिकून होता, त्यानंतर तासाभराने हा प्रभाव पूर्णपणे ओसरला आणि चंद्रदर्शन झाले, अशी माहिती नेहरू तारांगणाच्या संचालिका एन. रत्नश्री यांनी सांगितले. यानंतर एवढ्या मोठ्या कालावधीचे चंद्रग्रहण २१४१ साली होणार असल्याची माहितीही त्यांनी दिली. ■